**महाराष्ट्र शासन,**
**कामगार विभाग**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला, ई-ब्लॉक, सी-२२, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१

नस्ती क्रमांक : न्यायाप्र-२०२५/प्र.क्र.८६/समन्वय-०१/२०२५/जा.क्र.३८५

**वकिलांची नियुक्ती करण्याबाबत**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाशी संबंधित मा. उच्च न्यायालय, मुंबई आणि इतर खंडपीठांमध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या न्यायालयीन प्रकरणात मा. उच्च न्यायालयात मंडळाची बाजू मांडण्याकरिता तसेच न्यायालयीन प्रकरणी मंडळाच्या वतीने शपथपत्र दाखल करणे, न्यायालयीन प्रकरणामध्ये विधी विषयक सल्ला देणे इत्यादीकरिता एक वकिलाचे पद मानधन तत्त्वावर/कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करावयाचे आहे.

**वकिलाच्या नियुक्तीकरीता अर्हता/निकष :-**

१) शैक्षणिक अर्हता :- संवैधानिक विद्यापीठाची विधी शाखेतील एल.एल.बी./एल.एल.एम. पदवी उत्तीर्ण केलेली असावी.
२) मा. उच्च न्यायालयात किमान ५ वर्षे वकिल व्यवसाय केल्याचा अनुभव असावा.
३) कामगार विषयक कायद्याचे ज्ञान असावे तसेच कामगारांशी संबंधित न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव असावा.
४) मुंबई शहर किंवा मुंबई उपनगर या क्षेत्रात वास्तव्य असलेल्यांना प्राधान्य राहील.
५) सदर नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर प्रथम एक वर्षाकरीता राहील तद्नंतर कामाचे स्वरुप समाधानकारक असल्यास पुढील तीन वर्षांपर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.

इच्छुक विधी व्यवसायिक/वकिलांनी त्यांची फि/मानधनाच्या तपशिलासह त्यांचे अर्ज दि.१५/०३/२०२५ पर्यंत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मुख्यालयात टपालाने किंवा मंडळाचे अधिकृत ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com वर पाठविण्यात यावेत. अर्ज प्राप्त झाल्यावर मुलाखतीनंतर पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल.

स्थळ :- मुंबई
दिनांक :- १ मार्च, २०२५

सही/-
**(विवेक कुंभार)**
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**डी.जी.आय.पी.आर - २०२४-२५/६७७०**

Mahabharti.in